## संक्षिप्त वृत्त



### नू. म. वि. शिशु शाळेत विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात

**सोलापूर :** नू. म. वि. शिशु शाळेत मोठ्या गटातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ, क्रीडा स्पर्धेत विशेष कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण सोहळा तसेच विद्यार्थ्यांचे वाढदिवस असा संयुक्त कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर प्रास्ताविकात अर्चना कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी यावेळी शाळेबद्दलच्या आपल्या आठवणी आणि मनोगत व्यक्त केले. शाळेतील अनुभव, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि मित्रमैत्रिणींसोबत घालवलेले क्षण त्यांनी भावनिक शब्दांत मांडले. यानंतर क्रीडा स्पर्धांमध्ये विशेष कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ पार पडला. मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांचा उत्साह आणि आनंद पाहण्यासारखा होता. संगीत शिक्षिका अलका ओक यांनी या लाडक्या मुलांनो तुम्ही मला आधार हे भावगीत सादर करून विद्यार्थ्यांना भावनिक निरोप दिला. त्यांच्या या गीताने कार्यक्रमात विशेष वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सविता कुलकर्णी यांनी केले. विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ, बक्षीस वितरण आणि वाढदिवस अशा विविध उपक्रमांमुळे कार्यक्रम आनंददायी वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि उत्साह या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले.

### बार्शी येथे घरातून ५२ हजारांचे गंठण गायब

**बार्शी :** मुलीचे मेकअप करण्यासाठी घरात बोलावलेल्या महिलेने कपाटातील ५२ हजाराचे सोन्याचे गंठण शिताफीने पळविले. ही चोरी बार्शी शहरातील आगळगाव असलेल्या




भिसे प्लॉट येथे रविवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणी बार्शी शहरच्या पोलिसांनी एका महिलेविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. या संदर्भात अर्चना श्रीराम सांगळे (रा. भिसे प्लॉट, आगळगाव रोड) यांनी बार्शी शहर पोलीसात फिर्याद दाखल केली. नातेवाईकाचे लग्न असल्याने त्यांच्या दोन्ही विवाहीत मुली बार्शी येथे आल्या होत्या. त्यापैकी एकीने गळ्यातील तुटलेले सोन्याचे गंठण आईजवळ दिले होते. तर ते गंठण आईने कपाटात ठेवले होते. घटनेच्या दिवशी सकाळी मुलीचा मेकअप करण्यासाठी आलेली ती महिला दुपारी बाहेर जाऊन पुन्हा घरी आली. या दरम्यान दागिना चोरीस गेले असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास हवालदार साठे करीत आहेत.



बार्शी : खा. ज्योती वाघमारे यांचा सत्कार करताना शिवसेनेचे पदाधिकारी.

## बार्शीत शिवसेना वाढीसाठी खंबीर पाठबळ द्या

**शिवसैनिकांचे खासदार ज्योती वाघमारे यांना साकडे**

बार्शी/प्रतिनिधी

बार्शी शहर व तालुक्यात शिवसेनेला मानणारा मोठा वर्ग असून पक्ष संघटन वाढीसाठी अनुकूल वातावरण असल्याचे मत व्यक्त करत स्थानिक शिवसैनिकांनी नवनियुक्त खासदार ज्योती वाघमारे यांना खंबीर पाठबळ देण्याची मागणी केली. बार्शीत शिवसेना अधिक बळकट करण्यासाठी संघटनात्मक पाठिंबा मिळावा, असे साकडेही शिवसैनिकांनी यावेळी घातले.

बार्शीमध्ये शिवसेना वाढविण्यासाठी मोठी संधी उपलब्ध असल्याचे शिवसैनिकांनी सांगितले. राज्यातील लाडक्या बहिणींच्या योजना आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाबद्दल नागरिकांमध्ये सकारात्मक भावना असल्याने पक्षाला जनतेचा प्रतिसाद मिळत असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. या पार्श्वभूमीवर बार्शीमध्ये शिवसेनेचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी मार्गदर्शन व सहकार्याची अपेक्षा स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

यावेळी खासदार ज्योती वाघमारे यांचा बार्शीतील शिवसेना पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. शिवसेना उपजिल्हाप्रमुख अविनाश शिंदे, पांडुरंग पाटील तसेच महिला तालुकाध्यक्ष शितल मांजरे, शाहूबाई कसबे आणि मनीषा इंगळे यांनी खासदार ज्योती वाघमारे यांचा सत्कार केला.

या कार्यक्रमाला बार्शी तालुक्यातील अनेक शिवसैनिक उपस्थित होते. तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख लक्ष्मीकांत ठोंगे-पाटील यांचीही उपस्थिती होती. बार्शीमध्ये शिवसेनेचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# हिंदू नववर्षाच्या स्वागतास शहर सज्ज

## बाजारात रेडिमेड गुढीसह सजावटीच्या वस्तूंना मागणी



सोलापूर/प्रतिनिधी

हिंदू नववर्षाचे स्वागत करणारा गुढीपाडवा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून शहरात सणाची लगबग सुरू झाली आहे. गुढीपाडव्याच्या निमित्ताने बाजारपेठा सजल्या असून विविध प्रकारच्या गुढ्या, सजावटीचे साहित्य आणि पूजेच्या वस्तूंनी दुकाने गजबजून गेली आहेत. विशेष म्हणजे यंदा बाजारात रेडिमेड गुढीला मोठी मागणी वाढताना दिसत आहे.

वेळेची बचत आणि आकर्षक सजावट यामुळे शहरी भागातील नागरिक तयार गुढी खरेदी करण्यास प्राधान्य देत आहेत. पारंपरिक पद्धतीने गुढी उभारण्यासाठी लागणारी काठी, तांब्या, साडी, साखरेच्या गाठी आणि हार अशी सर्व साहित्ये वेगवेगळी गोळा करण्यापेक्षा सर्व साहित्य एकत्र असलेली रेडिमेड गुढी खरेदी करणे नागरिकांना अधिक सोयीचे वाटत आहे.

सध्या बाजारात लहान डेस्कटॉप गुढ्यांपासून ते ५ ते ६ फूट उंचीच्या आकर्षक गुढ्या विक्रीसाठी उपलब्ध आहेत. घरातील सजावटीसाठी लहान आकाराच्या गुढ्यांनाही चांगली मागणी आहे.

या गुढ्यांमध्ये मखमली कापड, पैठणी काठ असलेली वस्त्रे तसेच मस्तानी गुढी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खास डिझाइनच्या वस्त्रांचा नवीन ट्रेंडही पाहायला मिळत आहे. त्यामुळे गुढी अधिक आकर्षक दिसण्यासाठी ग्राहक विविध प्रकारच्या सजावटींची निवड करत आहेत. रेडिमेड गुढ्यांच्या किमतीही सर्वसामान्यांच्या आवाक्यात आहेत.

साधारणपणे दीडशे रुपयांपासून ते पाचशे रुपयांपर्यंत विविध प्रकारच्या गुढ्या उपलब्ध आहेत. या गुढ्यांमध्ये तांब्या, बांबूची काठी (स्टँडसह), हार आणि साखरेच्या गाठी यांचा समावेश असतो. त्यामुळे ग्राहकांना वेगळे साहित्य खरेदी करण्याची गरज राहत नाही. तसेच अनेक ग्राहक ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मच्या माध्यमातूनही गुढीचे साहित्य खरेदी करत असल्याचे दिसून येत आहे. ऑनलाइन माध्यमातून रेडिमेड गुढी किट घरबसल्या मागवण्याकडेही ग्राहकांचा कल वाढला आहे. त्यामुळे पारंपरिक सण साजरा करतानाच आधुनिक जीवनशैलीचा प्रभावही स्पष्टपणे दिसून येत आहे.

हिंदू परंपरेनुसार गुढीपाडवा हा विजय, आनंद आणि समृद्धीचे प्रतीक मानला जातो. या दिवशी घरासमोर गुढी उभारून नववर्षाचे स्वागत केले जाते. त्यामुळे गुढीपाडव्याच्या निमित्ताने शहरातील बाजारपेठा सणाच्या उत्साहाने फुलल्या असून नागरिकही नववर्षाच्या स्वागतासाठी सज्ज झाले आहेत.

**अशी उभी केली जाते गुढी**

काठीवर रेशमी वस्त्र बांधून त्यावर चांदीचे भांडे किंवा घरातील स्वच्छ भांडे ठेवले जाते. गुढीला कडुनिंबाची पाने, आंब्याच्या डहाळ्या तसेच साखरेची माळ बांधली जाते. रांगोळी काढावी. त्यानंतर हळद, कुंकू आणि फुले वाहून गुढीचे पूजन केले जाते. गुढीला ब्रह्मध्वज असेही म्हटले जाते. त्यामुळे ब्रह्मध्वजाची प्रार्थना करून नवीन वर्षाचे स्वागत करण्याची प्रथा आहे. प्रार्थना केल्यानंतर पंचांगाचे पूजन करून वर्षातील पहिल्या दिवसाचे पंचांग वाचले जाते. त्यानंतर कडुनिंब, गूळ आणि जिरे यांचे मिश्रण केलेले कडुनिंबाचे पाणी घेतले जाते. सूर्यास्ताच्या सुमारास गुढीला नमस्कार करून ती उतरवून ठेवली जाते.

## आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर बार्शी तालुक्यात आपत्कालीन कक्षाची स्थापना

**बार्शी :** आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर घरगुती गॅस व इंधन पुरवठ्याबाबत उद्भवू शकणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन सोलापूर जिल्हा प्रशासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील गॅस व पेट्रोल वितरणावर देखरेख ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात व तालुका स्तरावर २४०७ आपत्कालीन कक्ष स्थापन करण्यात आला आहे. सध्या आखाती भागात सुरू असलेल्या युद्धपरिस्थितीमुळे देशातील काही भागांमध्ये गॅस पुरवठ्यावर परिणाम होत असून सोलापूर जिल्ह्यातही काही ठिकाणी गॅस सिलेंडर मिळण्यात विलंब होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांना वेळेत गॅस उपलब्ध व्हावा आणि वितरण व्यवस्था सुरळीत राहावी यासाठी शासनाने कडक उपाययोजना अंमलात आणण्यास सुरुवात केली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात स्थापन करण्यात आलेल्या आपत्कालीन कक्षामार्फत गॅस तसेच पेट्रोल डिझेल वितरणासंदर्भातील तक्रारी तत्काळ नोंदवून त्यावर कार्यवाही करण्यात येणार आहे. नागरिकांनी गॅस किंवा पेट्रोल वितरणाबाबत काही अडचण असल्यास ०२१७-२७३१०१२ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून तक्रार नोंदवावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. नागरिकांनी अनावश्यक साठवणूक करू नये व कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी केल्याचे तहसीलदार एफ. आर. शेख यांनी म्हटले आहे.

## गॅस तुटवड्याचा फटका; हॉटेलमधील दरात वाढ




सोलापूर/प्रतिनिधी

शहरात व्यावसायिक गॅस सिलिंडरचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याने हॉटेल व्यवसायावर मोठा परिणाम झाला आहे. सिलिंडरच्या किंमतीतही वाढ झाल्यामुळे हॉटेल व्यावसायिकांचे आर्थिक गणित बिघडले आहे. मात्र कोणत्याही परिस्थितीत हॉटेल बंद ठेवायचे नाही, असा ठाम निर्णय हॉटेल असोसिएशनने घेतला असून पर्यायी इंधनांचा वापर करून व्यवसाय सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

सध्या व्यावसायिक गॅस सिलिंडरचे केवळ सुमारे ५० टक्के वाटप होत असल्याची माहिती हॉटेल व्यावसायिकांकडून देण्यात येत आहे. परिणामी अनेक हॉटेलांना आवश्यक तेवढा गॅस मिळत नसल्याने स्वयंपाकाची प्रक्रिया अडचणीत येत आहे. या परिस्थितीत हॉटेल व्यावसायिकांनी इंडक्शन कुकर, इंडक्शन शेगडी, इलेक्ट्रिक शेगडी, कोळशाच्या भट्ट्या तसेच मायक्रोवेव्ह ओव्हन यांचा वापर सुरू केला आहे. पर्यायी साधनांचा वापर करून ग्राहकांना सेवा देण्याचा प्रयत्न केला जात असला तरी इंधनाचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढल्याने व्यवसायावर ताण निर्माण झाला आहे.

> इंधनाचा दर वाढल्याने हॉटेल व्यावसायिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. कोणत्याही परिस्थितीत हॉटेल बंद ठेवायचे नाही, असा निर्णय घेतला आहे. मात्र इंधनाचा खर्च वाढल्यामुळे नाईलाजाने खाद्यपदार्थांच्या दरात सुमारे दहा टक्के वाढ करावी लागली आहे.
> **- संजीव इंदापुरे,** अध्यक्ष, हॉटेल असोसिएशन.

जास्त गॅस लागणारे पदार्थ तात्पुरते बंद ठेवणे किंवा त्यांची संख्या कमी करणे, असे उपाय अनेक हॉटेलांनी अवलंबले आहेत. विशेषतः पंजाबी व चायनीजसारखे अधिक इंधन लागणारे पदार्थ कमी करून कमी इंधनात तयार होणाऱ्या पदार्थांना प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे काही हॉटेलांच्या मेनूमध्येही बदल करण्यात आले आहेत.

इंधनाचा खर्च वाढल्याचा थेट परिणाम हॉटेलमधील दरांवरही झाला आहे.

हॉटेल असोसिएशनने प्रत्येक बिलामागे इंधनाचा सुमारे दहा टक्के अतिरिक्त दर लागू केला आहे. या निर्णयामुळे काही ग्राहकांनी हॉटेलमध्ये जेवण करणे कमी केल्याचेही व्यावसायिकांनी सांगितले आहे. ग्राहक संख्येत घट झाल्याची खंत हॉटेल व्यावसायिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. हॉटेल व्यवसाय हा मोठ्या प्रमाणावर गॅसवर अवलंबून असल्याने सिलिंडरच्या तुटवड्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती चिंताजनक ठरत आहे.

दरम्यान, या अडचणीच्या काळातही ग्राहकांना सेवा सुरू ठेवण्यासाठी हॉटेल व्यावसायिक विविध पर्यायांचा अवलंब करत आहेत.

## कुमठ्यातील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात रामनवमी उत्सव

सोलापूर/प्रतिनिधी

कुमठे येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात श्रीराम नवमी ते हनुमान जयंती निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २६ मार्च ते ३ एप्रिल या कालावधीत हा उत्सव भक्तिमय वातावरणात साजरा होणार असून दररोज कीर्तन, प्रवचन, रामकथा, ज्ञानेश्वरी पारायण आणि हरिपाठ अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

उत्सवाच्या काळात दररोज पहाटे चार वाजता काकडा, सकाळी सात वाजता ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी बारा वाजता गाथा भजन, दुपारी दोन ते पाच या वेळेत श्रीराम कथा निरूपण, सायंकाळी पाच वाजता हरिपाठ, सायंकाळी सहा वाजता प्रवचन, रात्री आठ वाजता हरी कीर्तन आणि रात्री दहा वाजता हरिजागर असा कार्यक्रमाचा दिनक्रम राहणार आहे. दररोज श्रीरामकथेचे निरूपण अभिम न्यू पाटील महाराज करणार आहेत.



उत्सवात नामवंत कीर्तनकार महाराजांची कीर्तनेही आयोजित करण्यात आली आहेत. दि. २६ मार्च रोजी सकाळी दहा ते बारा या वेळेत पांडुरंग माने यांचे रामजन्माचे कीर्तन होणार असून रात्री आठ वाजता वैभव महाराज काणेगावकर यांचे कीर्तन होईल. दि. २७ मार्च रोजी संजय पाटील महाराज, दि. २८ मार्च रोजी प्रदीप माने महाराज, दि. २९ मार्च रोजी माऊली पाटील महाराज, दि. ३० मार्च रोजी सागर महाराज पवार, दि. ३१ मार्च रोजी संभाजी महाराज मेहूणकर, दि. १ एप्रिल रोजी श्रीगुरू यशवंतबापू बोधले महाराज यांची

**कीर्तन, प्रवचनांचे आयोजन**

कीर्तने होणार आहेत. दि. २ एप्रिल रोजी पहाटे पाच ते सात या वेळेत शाम जोशी महाराज यांचे हनुमान जन्म कीर्तन होणार असून रात्री आठ वाजता गुरुवर्य काकासाहेब महाराज पाटील यांचे कीर्तन होईल. दि. ३ एप्रिल रोजी काल्याचे कीर्तन होणार असून सकाळी दहा ते बारा या वेळेत सुधाकर महाराज इंगळे यांचे कीर्तन होणार आहे. उत्सवाच्या काळात विविध प्रवचनकार महाराजांचे प्रवचनही आयोजित करण्यात आले आहे. दि. २६ मार्च रोजी अरुण निळ महाराज, दि. २७ मार्च रोजी संजय पाटील महाराज, दि. २८ मार्च रोजी विजय घोडके महाराज, दि. २९ मार्च रोजी मुकुंद ताकमोगे महाराज, दि. ३० मार्च रोजी सोपान महाराज पवार, दि. ३१ मार्च रोजी महादेव वाघमारे महाराज, दि. १ एप्रिल रोजी चंद्रकांत गुरव महाराज आणि दि. २ एप्रिल रोजी संतोष घोडके महाराज प्रवचन करणार आहेत. भाविकांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## ग्रामसेवकावर कोट्यवधींच्या भ्रष्टाचाराचे आरोप; चौकशीची मागणी

**करमाळा :** करमाळा तालुक्यातील शेटफळ (ता. करमाळा) ग्रामपंचायतीतील ग्रामसेवकावर कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप करत चौकशीची मागणी करण्यात आली आहे.

याबाबत ग्रामस्थ नवनाथ रामदास गुंड यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती करमाळा यांच्याकडे लेखी निवेदन दिले आहे. निवेदनानुसार, संबंधित ग्रामसेवक गेल्या काही वर्षांपासून कार्यरत असून विकासकामांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. कामांची माहिती न देणे, खर्चाबाबत पारदर्शकता न ठेवणे तसेच विचारणा केल्यास उडवाउडवीची उत्तरे दिली जात असल्याचेही निवेदनात नमूद आहे.

२०१२ ते २०१६ या कालावधीत सुमारे १ कोटी २२ लाख रुपयांच्या अपहाराचा संशय व्यक्त करण्यात आला असून याबाबत सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच, या प्रकरणाची लवकर चौकशी न झाल्यास आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे. सदर निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री, पंचायत राज मंत्री तसेच जिल्हा परिषद सोलापूर यांना पाठविण्यात आल्या आहेत.

## कलिंगड, खरबूज, द्राक्ष फळांना नागरिकांची पसंती

### उन्हाळ्यात शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकवून ठेवण्यासाठी उपयोगी



सोलापूर/प्रतिनिधी

उन्हाळ्याची चाहूल लागताच शहरातील बाजारपेठांमध्ये हंगामी फळांची मोठ्या प्रमाणावर आवक वाढली आहे. विशेषतः कलिंगड, खरबूज आणि द्राक्षे यांची विक्री जोरात सुरू झाली असून नागरिकही या फळांना मोठी पसंती देत आहेत. उन्हाळ्यात शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकवून ठेवण्यासाठी आणि उष्णतेपासून दिलासा मिळवण्यासाठी सोलापूरकर नागरिक या रसाळ फळांची खरेदी करताना दिसत आहेत.

शहरातील विविध चौक, मुख्य रस्ते तसेच बाजारपेठांमध्ये फळांचे स्टॉल मोठ्या प्रमाणावर दिसू लागले आहेत. अनेक विक्रेत्यांनी कलिंगड, खरबूज आणि द्राक्षांचे ढीग रचून ग्राहकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला आहे. उन्हाची तीव्रता वाढू लागल्यामुळे या फळांची मागणीही दिवसेंदिवस वाढत असल्याचे चित्र आहे.

गेल्या आठवड्याच्या तुलनेत या आठवड्यात फळांच्या खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी अधिक दिसून येत आहे. सकाळपासूनच बाजारपेठेत नागरिकांची वर्दळ वाढत असून कुटुंबासाठी ताजे आणि गोड फळे निवडताना ग्राहक दिसत आहेत. काही ठिकाणी शेतकऱ्यांकडून थेट आणलेली ताजी फळे विक्रीसाठी ठेवण्यात आली आहेत.

विक्रेत्यांच्या मते, उन्हाळ्याच्या सुरुवातीला कलिंगड, खरबूज आणि द्राक्षांची





मागणी वाढते.

तापमान वाढत असल्याने नागरिक थंडावा देणाऱ्या आणि शरीराला ऊर्जा देणाऱ्या फळांना प्राधान्य देतात. त्यामुळे बाजारपेठेत या फळांची आवक आणि विक्री दोन्ही वाढल्याचे दिसून येत आहे.

यंदा फळांचा दर्जा चांगला असल्याने ग्राहकांकडूनही समाधान व्यक्त केले जात आहे. पुढील काही आठवड्यांत उन्हाची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता असल्याने बाजारपेठेत हंगामी फळांची आवक आणखी वाढण्याची शक्यता विक्रेत्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे सोलापूरकरांना आगामी दिवसांत ताज्या आणि रसाळ फळांचा आनंद घेता येणार आहे.